कामगार कल्याण जनसंपर्क विभाग

# ई - न्युजलेटर



सोलापूर महानगरपालिका

Volume : XXII Issue : VI Date : 18-09-2017

## मा. जिल्हा उद्योग केंद्रातर्फे सर्व शासकीय कार्यालयांना खरेदी करिता Gem पोर्टल वापरण्याची सुचना.

केंद्र शासनाने शासकिय खरेदीदार विभागांसाठी वस्तू व सेवांच्या खरेदीसाठी गव्हर्नमेंट ई मार्केटप्लेस (GeM) हे पोर्टल विकसित केले आहे. सदर पोर्टलवर सद्यस्थितीत २५८०० उत्पादक/पुरवठादार नोंदणीकृत असून,त्यांच्याकडुन १,१३,००० वस्तू व १७ सेवा उपालब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. GeM पोर्टलवर खेरेदी करतांना खरेदरीदार विभागाच्या गरजेनूसार निविदा फार्म तयार करण्याची सूविधा असून जास्तीत जास्त पर्याय उपलब्ध होवून खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून पोर्टलव्दारे राबविण्यात येणारी खरेदी पध्दत ही मानवी हस्तक्षेपाशिवाय असून संपूर्णत: ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येणार आहे. यामूळे नेमक्या व योग्य नामांकित दर्जाच्या वस्तूंचा पुरवठा वाजवी किंमतीत उपलब्ध होणार आहे.तसेच खरेदी प्रक्रियेच्या कालावधीमध्ये बचत होणार आहे. महासंचालक पुरवठा व विल्हेवाट ही (DGS&D) दिनांक ३१/१०/२१७ पासून बंद होणार असून सदर संघटनेमार्फत होणारी कार्यवाही ही GeM पोर्टलीवर परावर्तित होणार आहे.

राज्य शासनाने शासन निर्णय क्र संकीर्ण-२०१६/प्र.क्र २१५/उद्योग -४ दिनांक २४ ऑगस्ट २०१७ अन्वेय GeM या वेब पोर्टलवर खरेदीची कार्यपध्दती स्विकृती करुन लागू करण्यात आलेली आहे.राज्य शासनाच्या अखात्यारितील सर्व शासकिय विभागांना तसेच महानगर पालिका/नगर पालिका/जिल्हा परिषदा/अंगिकृत व्यवसाय/स्वायत्त संस्था व शासनाच्या मालकीच्या व नियंत्रणाखालील असलेली कोणतीही संस्था यांना गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस (GeM) या वेब पोर्टलच्या माध्यमातून दिनांक १/१२/२०१६ रोजीच्या सुधारित खरेदी धोरणातील तरतूदीचा अवलंब करुन खरेदी करणे बंधनकारक करण्यात आलेला आहे.गव्हर्नमेंट ई मार्केट प्लेस पोर्टलवर खरेदीदार विभागांना व राज्यातील उत्पादक /पुरवठादारांना नोदणीकृत होण्यासाटीची प्रक्रिया अत्यंत सूटसुटित असून , नोदणी करण्यासाठी पॅन क्र/आधार क्र इत्यादी बाबी नमूद करुन खरेदीदार विभाग व उत्पादक पुरवठादार दहा ते पंधरा मिनिटाच्य ा कालावधीत GeM पोर्टलवर नोंदणीकृत होवू शकतात.

करिता जिल्हयातील सर्व शासकिय कार्यालयांना अवाहन करण्यात येते की ,त्यांनी या पोर्टलवरुन खरेदी करावी व सूक्ष्म ,लघु व मध्यम घटक व पुरवठादारांनी आपल्या उत्पादित बाबीची/पुरवठा करणा-या बाबीची नोंदणी या पोर्टलवर करावी व शासकिय खरेदी धोरणात सहभागी व्हावे.नमूद शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१७०८२४१२३५१६२११० असा आहे.

संपर्क – @ -0217-2735280